**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**पुणे वृत्तांत**
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक: 29..04.2024** **वार: सोमवार**

---

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. पुणे जिल्ह्यातील महायुतीच्या चारही उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी आता थोड्याच वेळात पुण्यात जाहीर सभा घेणार आहेत.

महाविकास आघाडीचीही उद्या संध्याकाळी पुण्यात जाहीर सभा होणार आहे. या सभेला शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात संबोधित करतील.

दरम्यान येत्या तीन तारखेला पुण्यात राहुल गांधी यांची सभा होणार असल्याचं कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. तसंच प्रियंका गांधी देखील पुण्यात रोड शो घेणार आहेत, असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी भाजपावर जोरदार टीका केली. सर्व जातींना न्याय देण्याचा आणि जातिनिहाय जनगणना करण्याचा कॉँग्रेसचा आग्रह आहे, असं पटोले म्हणाले.

वंचित बहुजन आघाडीसाठी यंदा सकारात्मक वातावरण असून यावेळी आम्ही आमचं लोकसभेतलं खातं नक्की उघडू असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांनी आज पुण्यात व्यक्त केला. वंचितचे उमेदवार वसंत मोरे यांच्या प्रचाराची सुरूवात आंबेडकर यांच्या उपस्थितीत झाली; त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मतदारचिठ्ठी</u>**

प्रत्येक मतदारला, मतदार चिठ्ठी देण्यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावं असे निर्देश शिरुर लोकसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिले आहेत. आंबेगाव विधानसभा मतदासंघातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>बियाणे</u>**

खरीप हंगामात पुणे जिल्हयात सुमारे दोन लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्यांचं नियोजन कृषी विभागाने केलं आहे. त्यासाठी ३६ हजार ७६६ क्विंटल बियाण्यांचा पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती पुणे जिल्हा कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. खरीप हंगामसाठी दोन लाख १२ हजार टन खत पुरवण्याचं नियोजनही केल्याचं काचोळे यांनी सांगितलं.

**<u>पाणी पुरवठा</u>**

पुणे जिल्ह्याच्या पुरंदर आणि बारामती तालुक्यातील नागरिकांना पाणी पुरवठा करणारं नाझरे धरण कोरडं पडल्यानं स्थानिक नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली आहे. या धरणातील जलाशयावर अवलंबून असणाऱ्या पुरंदर तालुक्यातील काही कुटुंबांनी आपलं गाव सोडून पाणी मिळेल तिकडं भटकंती सुरु केली आहे. येत्या ७ मे रोजी बारामती लोकसभा मतदार संघात होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक मतदार पाण्यासाठी घरदार सोडून बाहेर जाऊ लागल्यानं राजकीय पक्षाकडून देखील चिंता व्यक्त करण्यात आली असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. सुमारे पाऊण टीएमसी क्षमता

असलेल्या या नाझरे धरणातून पुरंदर तालुक्यातील ३५ आणि बारामती तालुक्यातील १९ गावांना पाणी पुरवठा केला जातो.

संविधान उद्यान
पुण्यात लष्कराच्या दक्षिण मुख्यालय क्षेत्रातल्या सुद्ध स्मारकाजवळ संविधान उद्यान उभारण्यात आलं आहे. या उद्यानाचं उद्घाटन नुकतंच दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल अजय कुमार सिंग यांच्या हस्ते झालं. सशक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येकाच्या मनात संविधानाविषयी आत्मीयता असणं महत्त्वाचं आहे असं लेफ्टनंट जनरल अजय कुमार सिंग यावेळी म्हणाले.

## <u>क्रीडा</u>

दुबईमध्ये झालेल्या कनिष्ठ गट आशियाई अजिंक्यपद मैदानी स्पर्धेत मुलांमध्ये पुण्याच्या गौरव भोसले या धावपटूने रौप्य पदक मिळवलं आहे. वीस वर्षाखालील गटात तीन हजार मीटर धावणे प्रकारात त्याने ही कामगिरी केली.

## <u>हवामान</u>

पुणे शहरातील काही भागासह जिल्ह्यातील अनेक भागात तापमानाचा पारा अचानक वाढला असून त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सावधानता बाळगण्याचं आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केलं आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून शहराच्या कोरेगाव पार्क, शिवाजीनगर, वडगाव शेरी या भागासह अन्य काही भागात आणि जिल्ह्यातील शिरुर, तळेगाव ढमढेरे परिसरासह अन्य काही तालुक्यात ४3 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत असून वाढत्या उष्म्यानं नागरिक हैराण झाले आहेत. परिसरातील शीतपेय विक्री करणाऱ्या दुकानावरील गर्दी वाढू लागली आहे. आगामी ४ ते ५ दिवस तरी तापमानाचा पारा चढाच राहण्याची शक्यता असल्याचा

अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. या कालावधीत कुठेही पूर्व मोसमी पावसाची शक्यता नसल्यानं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 42 अंश तापमानाची नोंद झाली. उद्याही कमाल तापमान 40 च्या पुढेच असेल आणि आकाश निरभ्र असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**